www.ecourtsindia.com



CNR No.MHSCA2001756-2013

## लघुवाद न्यायालय, मुंबई

## आर.ए.ई.आणि आर. दावा क्र.६९०/११०१ ऑफ २०१३

**मधील**

**निशाणी क्र.५० वर आदेश**

कावासजी दिनशॉ ट्रस्ट आणि इतर ... **वादी**

**विरुध्द**

१. अंडर सेक्रेटरी आणि इतर ... **प्रतिवादी**

आणि

श्री. केसरी के. कमिनसरेट आणि इतर ...प्रस्तावित वादी

**पीठासन : अ. अ. मेहेंदळे,**
**न्यायाधीश, न्या.क्र.६,**
**दिनांक :२१ /०२/२०२५**

१. वादी यांनी दावा दुरुस्तीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी क्र.२ यांचे दि. २६.१२.२०१३ रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे त्यांचे नाव दाव्यामधून कमी करून शेडयुल मध्ये नमुद केलेल्या व्यक्तीचे नाव दाव्यामध्ये संभाव्य वादी क्र. ७ म्हणून समाविष्ट करण्यात यावे व वादी क्र.२ यांचे नाव कमी करावे अशी मागणी वादी यांनी केलेली आहे.

२. वादींच्या म्हणण्याप्रमाणे सदरहु दावा गुणदोषावर चालण्याकरिता दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास त्यांना परवानगी देण्यात यावी.



This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHSCA20017562013/truecopy/order-10.pdf

www.ecourtsindia.com



३.            सदरहू अर्जाला अनुषंगुन प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्याच अर्जावर त्यांचे विस्तृत म्हणणे दिलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांचे विस्तृत म्हणणे नि.क्र.५४ कडे दाखल केलेले आहे. प्रतिवादींनी वादींचा अर्ज चुकीचा आहे असे प्रतिपादन करून अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

४.            वादी-प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन पुढील विवाद मुद्दा माझेसमोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे -

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो काय? | होकारार्थी |
| २ | कोणता आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ बाबत</u> -

५.            सदरहु अर्जाला अनुसरून मुळ दाव्याचे अवलोकन केले. तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतची केस ही ताबा मिळण्याकरिता दाखल केलेली आहे. तसेच सदरची केस ही सुमारे १२ वर्षे जुनी आहे. सदरची केस उलटतपासासाठी प्रलंबित असताना दावा दुरूस्तीचा अर्ज देण्यात आलेला आहे असे केसचे स्वरूप आहे.

६.            निर्विवादपणे दावा हा संबधीत ट्रस्ट तर्फे दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे दाव्याचा मथळा योग्य असणे आवश्यक आहे. सदरहु केस मधील वादी क्र.२ यांचा दि.२६.१२.२०१३ रोजी निधन झालेले आहे असे



This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHSCA20017562013/truecopy/order-10.pdf

मृत्युप्रमाणपत्रावरून दिसून येत आहे. परंतु अशी परिसिथती असतानांही वादी क्र. २ च्या मृत्युमुळे त्याचे नाव वादीपणातून कमी करण्याबाबत व अन्य व्यक्तीला पक्षकार करण्याकरिता अर्ज देण्यास वादी यांनी ११ वर्षे इतका उशीर का लागला ? याचे समाधानकारक स्पष्टीकरण वादी यांनी त्यांच्या अर्जात केलेले नाही.

७. वादी यांनी अंत्यत मोघमपणाने वादी क्र.२ यांचे निधन झाल्याने त्यांचे नाव वादीपणातून वगळण्यात यावे व संभाव्य वादी क्र. ७ यांना केसकामी पक्षकार करावे अशी मागणी केलेली आहे. परंतु वादी यांनी वादी क्र.२ यांचा मृत्यु सन २०१३ मध्ये झालेला आहे त्यामुळे त्यांना अर्ज देण्यास उशीर झालेला आहे याबाबत अर्जात काहीही नमुद केलेले नाही.

८. सदरहू दाव्यामधील महत्त्वाची बाब म्हणजे वादी यांचा पुरावा चालू झालेला आहे. सदरचा दावा १२ वर्षे जुना आहे. जर ट्रस्टच्या एखादया ट्रस्टीचे निधन झालेले असेल व दुस-या व्यक्तीला केस कामी पक्षकार करायचे असेल तर वादी यांनी सदरची दुरूस्ती करण्यासाठी आधी का अर्ज केला नाही ? याचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये केलेले नाही. परंतु अशी जरी बाब असली तरी यापुर्वी विस्तृतपणे कथन केल्याप्रमाणे दाव्याचा मूळ गाभा योग्य व बरोबर असणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी क्र.२ मृत्यु झाल्यामूळे तशी दाव्याच्या मथळयामध्ये दुरूस्ती करण्यास जर वादी यांना परवानगी दिली तर सदरहु दावा भविष्यात गुणदोषावर चालण्यास मदत होणार आहे.

९. अशाप्रकारे दावा दुरुस्त करण्यास जर वादी यांना परवानगी दिली तर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे देणेची संधी उपलब्ध राहणार आहे. सबब



This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHSCA20017562013/truecopy/order-10.pdf
www.ecourtsindia.com

www.ecourtsindia.com



उभय पक्षकारांना भविष्यात त्रास होवू नये म्हणून जर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर केला तर कोणावरही अन्याय होणार नाही.

१०.        निश्चितच सदरहु अर्ज विचारात घेत असताना दावा बारा वर्षे जुना आहे या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे वादींचा दावा दुरूस्तीचा अर्ज मंजुर करताना वादींनी अर्ज दाखल करण्यात जी दिरंगाई केलेली आहे, त्याबद्दल वादी यांना कॉस्ट करणे आवश्यक ठरते. सबब सदरहु अर्ज वादी यांनी ५०००/- इतकी कॉस्ट सरकारजमा करण्याच्या पूर्वलक्षित अटीवर मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

आ दे श

१.    वादी यांचा नि. क्र. ५० कडील दावा दुरूस्तीचा अर्ज त्यांनी रू.५०००/- इतकी कॉस्ट सरकारजमा करण्याच्या पूर्वलक्षीत अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२.    वादी यांनी हुकुमापासुन सात दिवसात रू.५०००/- एवढी कॉस्ट सरकारजमा करावी.

३.    जर वादी यांनी विहित मुदतीत कॉस्टची रक्कम जमा केली नाही तर प्रस्तुतचा हुकुम आपोआप संपुष्टात येईल यांची वादी यांनी नोंद घ्यावी.

४.    सदरहु आदेशाची वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

(न्यायालयासमोर घोषित केले.)

Digitally signed by ABHAY ASHOK MEHENDALE
Date: 2025.02.21 17:12:14 +0530

**मुंबई**                                        **(अ. अ. मेहेंदळे)**
**दिनांक : २१.०२.२०२५**                          **न्यायाधीश, न्या.क्र.६**



This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHSCA20017562013/truecopy/order-10.pdf

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHSCA20017562013/truecopy/order-10.pdf

www.ecourtsindia.com